# ।। मरुळसिध्दांची मठपरंमपरा ।।

---

**मरुळसिध्दांच्या मठपरंपरेतील अर्वाचीन साधू कल्मेश्वर .**

कल्मेश्वर यांची सर्कस होती. एकदा ते सर्कशीसह उज्जनी मध्ये होते. तेथे मरुळसिध्दांच्या मठातील सिध्देश्वर महाराजांना त्यांनी सर्कस पाहण्याचे आमंत्रण दिले. प्रथम सिध्देश्वरानी नकार दिला. पुढे कल्मेश्वरांच्या आग्रहाने ते सर्कस पाहण्यास गेले.त्यांच्याकडे कल्मेश्वरानी आशीर्वाद मागीतला. दुसरे दिवशी कल्मेश्वर, मठात येताच सिध्देश्वरानी त्याना अनुग्रह दिला व सर्कस बंद करण्यास सांगितले. लगेच कल्मेश्वरानी सर्कस विकून टाकली व निष्ठेने साधन केले. त्याना प्राप्त झालेला अधिकार पाहून कल्मेश्वराना अनुग्रह देत जाण्याची आज्ञा सिध्देश्वरानी केली. कल्मेश्वरानी शिरगुर येथे आपला मठ स्थापन केला. ते एकतारी भजन करीत व त्यात देहभान विसरुन जात. दिनांक 11-06-1968 रोजी कल्मेश्वरानी शिरगुर येथे भजन करीत देह ठेवला.

संदर्भ : **प. पू. ब्रह्मलिन श्री दासराम महाराज केळकर** सांगली यांचे हस्तलिखीताचे आधारे ।। **चिमड संप्रदाय**।।

लेखक : **प्रा .डॉ .के .वा .आपटे**. सांगली

प्रकाशक : **प . पू .श्री चंदशेखर महाराज केळकर**